# शाळांमध्ये 'सायबर बडीज'

## इंटरनेट माहितीच्या प्रसारासाठी सरकारचा उपक्रम

**प्राची आंधळकर,**
कॉलेज क्लब रिपोर्टर

**मुंबई :** इंटरनेट हा बदलत्या जगाचा 'पासवर्ड' पालकांनीच विद्यार्थ्यांना समजून सांगितला पाहिजे. या माध्यमाचा प्रभावी वापर करत खेळाच्या माध्यमातून अभ्यासक्रम शिकवण्याचा विचार सरकार करत आहे. त्यासाठी शाळांमध्ये 'सायबर बडीज'सारखे उपक्रम सुरू करण्याचा सरकारचा मानस आहे. याअंतर्गत काही मुलांना इंटरनेटबद्दल माहिती देऊन त्यांच्याद्वारे वर्गातील इतर विद्यार्थ्यांना ही माहिती देण्याचे काम हे 'बडीज' करतील, अशी माहिती 'शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी शनिवारी दिली.

'अहान फाऊंडेशन' आणि 'क्विकहील फाऊंडेशन' यांनी बोरिवलीच्या प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृहामध्ये संयुक्तरीत्या आयोजित केलेल्या 'सायबर सुरक्षा जनजागृती शिक्षण' उपक्रमाच्या उदघाटनप्रसंगी शिक्षणमंत्री तावडे यांनी इंटरनेटचे महत्त्व विषद केले. सध्या सगळ्या शाळांमध्ये पालकसभा चालू आहेत. त्यामध्ये पालकांनाही इंटरनेटचे महत्त्व समजावून द्या. मुलगा दोन तास इंटरनेटचा वापर करून घरातून बाहेर पडतो. त्यानंतर त्याने इंटरनेटवर काय पाहिले, हे पालकांनी शोधून काढायला हवे. 'गुगल हिस्टरी'मध्ये जाऊन आढावा घेण्यासाठी पालकांना इंटरनेट वापरता येणे गरजेचे आहे, असाही सल्लाही त्यांनी यावेळी दिला.



### रिस्पॉन्सिबल नेटिझन

लहान मुलांपासून प्रत्येकजण आज तंत्रज्ञानाशी जोडलेला आहे. मात्र इंटरनेटच्या या जाळ्यात या मुलांकडून अनावधानाने अनेक चुकाही होतात. त्यातून सायबर गुन्हे, सायबर वॉलसारखे अनेक प्रश्न उदभवतात. प्रत्येक विद्यार्थ्याला आज इंटरनेट, सोशल मीडियाची माहिती आहे. इंटरनेटचा सुयोग्य वापर करून विद्यार्थी हुशार बनतात, मात्र त्यासाठी 'रिस्पॉन्सिबल नेटिझन' असणे गरजेचे आहे.